# प्रेसनोट

नाशिक,
दि.१५/२/२०२२

**आलोसे सुनिल पुंडलिक बोरसे, अवल कारकून, पुरवठा विभाग, तहसिल कार्यालय पेठ, ता.पेठ, जि. नाशिक यांना ५,०००/— रुपये लाचेची रक्कम स्विकारतांना अटक करून त्यांचेविरूध्द भ्रष्टाचार प्रतिबंध अधिनियमान्वये कारवाई केलेबाबत.**

| | |
|---|---|
| लाचलुचपत प्रतिबंधक विभाग/घटक | नाशिक |
| गुन्हा नोंद क्रमांक | कार्यवाही सुरु आहे |
| कलम | भ्रष्टाचार प्रतिबंध अधिनियम सन १९८८ चे कलम ७ प्रमाणे |
| आरोपीचे नाव व कार्यालय | सुनिल पुंडलिक बोरसे, अवल कारकून पुरवठा विभाग, तहसिल कार्यालय पेठ, ता.पेठ, जि.नाशिक |
| मागणी केलेली लाचेची रक्कम | ५,०००/— रूपये |
| स्विकारलेली लाचेची रक्कम | **५,०००/— रूपये** |
| थोडक्यात माहिती | यातील तक्रारदार महिला ही मजुर असून तिच्या पतीचे गुजरात येथील रेशनकार्ड वरील पतीचे नांव कमी करण्याचा रिपोर्ट पाठविण्यासाठी व बंद करण्यात आलेला रेशनचा धान्य पुरवठा पूर्ववत सुरु करण्यासाठी आलोसे सुनिल पुंडलिक बोरसे, अवल कारकून पुरवठा विभाग, तहसिल कार्यालय पेठ, ता.पेठ, जि.नाशिक यांनी तक्रारदार यांचेकडे ५,०००/—रुपये लाचेची मागणी केल्याने तक्रारदार यांनी लाचलुचपत प्रतिबंधक विभाग नाशिक कार्यालयात तक्रार दिली होती.<br>सदर तक्रारीवरुन ला.प्र.वि. नाशिक पथकाने सापळापुर्व पडताळणी करुन सापळा आयोजित केला असता आलोसे सुनिल पुंडलिक बोरसे, अवल कारकून पुरवठा विभाग, तहसिल कार्यालय पेठ, ता.पेठ, जि.नाशिक यांनी पंचसाक्षीदारांसमक्ष तक्रारदार यांचेकडे ५,०००/— रुपये लाचेची मागणी करुन सदर लाचेची रक्कम आज दि.१५/२/२०२२ रोजी तहसिल कार्यालय पेठ येथील पुरवठा विभाग कक्षात स्विकारली असतांना पकडण्यात आले असून त्यांचेविरूध्द भ्रष्टाचार प्रतिबंध अधिनियमान्वये गुन्हा दाखल करण्याची प्रक्रिया सुरु आहे. |

लाचलुचपत विभागातर्फे नागरीकांना आवाहन करण्यात येते की, भ्रष्टाचारासंबंधी काही माहिती असल्यास अगर लाच मागणाऱ्या लोकसेवकाबद्दल तक्रार असल्यास लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, नाशिक परिक्षेत्र, नाशिक येथे संपर्क करावा.

संपर्क पत्ता :— ला.प्र.वि. नाशिक परिक्षेत्र, नाशिक
संकेतस्थळ :— acbmaharashtra.gov.in
ई— मेल :— spacbnashik@mahapolice.gov.in
ऑनलाईन तक्रार :— acbmaharashtra.net
टोल फ्री क्रमांक :— १०६४
दुरध्वनी क्रमांक :— ०२५३—२५७५६२८, २५७८२३०
व्हॉट्स ॲप क्र :— ९९३०९९७७००

(सतिश भामरे)
वाचक पोलीस उपअधीक्षक
लाचलुचपत प्रतिबंधक विभाग,
नाशिक परिक्षेत्र, नाशिक.